# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.04.2025** **वारःशुक्रवार**

१.मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा भारताच्या ताब्यात;एनआयएकडून अटक

२.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज आणि उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर,

३.राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती,

४.भगवान महावीर यांची जयंती राज्यात उत्साहात साजरी,

आणि

५. अमेरिकेत लॉस एंजेलिस इथं होणाऱ्या २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश

**<u>राणा</u>**

२६-११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारताकडे प्रत्यार्पण झालं आहे. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक काल संध्याकाळी विशेष विमानानं त्याला घेऊन नवी दिल्लीत पोहोचलं. त्यानंतर त्याला पटियाला हाऊस न्यायालयात हजर करण्यात आलं; राणाला 18 दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. तहव्वूर राणा याला मुंबई हल्ल्याप्रकरणी २००९मध्ये अमेरिकेत अटक झाली होती. या हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड हेडली याला मदत केल्याचा त्याच्यावर ठपका आहे.

राणाचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. एका खासगी वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना अमित शहा म्हणाले....

दरम्यान, याप्रकरणी सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी केंद्र सरकारनं नरेंदर मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे.

**<u>अमितशहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज आणि उद्या राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. आज रात्री आठ वाजता त्यांचं पुण्यात आगमन होईल. उद्या सकाळी रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील. त्यानंतर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचं दर्शन घेतील आणि रायगडावर आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. त्याच दिवशी संध्याकाळी साडेपाच वाजता मुंबईत गुजराती साप्ताहिक पत्रिका 'चित्रलेखा'च्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

**<u>याचिकासुनावणी</u>**

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर पुढच्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठासमोर १६ एप्रिल रोजी ही सुनावणी होईल.

**<u>सरनाईक</u>**

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते एसटी महामंडळाचे २६वे अध्यक्ष आहेत. एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवाशांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं सरनाईक यांनी म्हटलं आहे. दरम्यान,

एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित 44 टक्के पगार येत्या मंगळवारपर्यंत देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात वित्त सचिवांशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

**<u>एकनाथशिंदे</u>**

दुष्काळग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करणं आणि सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. सोलापूर जिल्ह्यात सांगोला इथं भीमसैनिकांनी उभारलेल्या निधीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी शिंदे  बोलत होते.

**<u>भूमापनदिन</u>**

भूमापन दिनानिमित्त सांगली जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाच्या वतीनं काल विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. याविषयी अधिक माहिती सांगताना जिल्हा अधीक्षक सुरेखा सेठिया म्हणाल्या.....

**<u>सुरेखासेठिया-बाईट</u>**

**<u>महात्माफुलेजयंती</u>**

थोर समाज सुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती आहे. या निमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीनं क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आजपासून येत्या 16 एप्रिलपर्यंत विचार प्रबोधन पर्व या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**<u>महावीरजयंती</u>**

जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती काल देशभर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. नालंदा इथंही पावापुरीमधल्या जैन मंदिरात जैन भाविकांनी पूजाअर्चा केली.

राज्यातही त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं  होतं.

ठीकठिकाणच्या जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यासह नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, नाशिक, धुळे, अकोला इथं  काल भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सांगलीमध्ये शोभायात्रा तसंच रक्तदान शिबिर आणि निबंध; वक्तृत्व स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं. अहिल्यानगरमध्येही मिरवणूक काढण्यात आली आणि राष्ट्रसंत आनंद ऋषीजी  यांच्या आनंद धाममध्ये जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

**<u>चैत्रोत्सव</u>**

चैत्रोत्सवानिमित्त काल चतुर्दशीच्या महत्त्वाच्या दिवशी नाशिक जिल्ह्यातील वणी इथल्या सप्तशृंग गडावर सुमारे दोन लाखांहून अधिक भाविकांनी हजेरी लावली. ट्रस्ट आणि पोलिस प्रशासनानं गर्दी नियंत्रित करण्यासाठी अथक प्रयत्न केले; त्यामुळे गर्दी वाढल्यानंतरही सर्व परिस्थिती नियंत्रणात असल्याचं नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितलं.

**<u>इंट्रो</u>**

**<u>महामंडळ</u>**

साहित्य संस्थांची शिखर संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध वक्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांची एकमतानं निवड करण्यात आली आहे. सुनिताराजे पवार यांची कार्यवाह म्हणून तर कोषाध्यक्ष म्हणून विनोद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत साहित्य महामंडळाची बैठक प्रा. उषा तांबे यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली.

पुढील तीन वर्षे साहित्य महामंडळाचं कामकाज आणि साहित्य संमेलनांचं आयोजन पुण्यातून होणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना मिलिंद जोशी म्हणाले----

**<u>बाईट–मिलिंदजोशी</u>**

**<u>दीनानाथ</u>**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गरोदर महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची प्राथमिक चौकशी समितीमार्फत झाली असून, त्यात रुग्णालयाला दोषी ठरवण्यात आलं आहे. या प्रकरणी रुग्णालयावर कारवाई करण्याची शिफारस महापालिका आणि धर्मादाय आयुक्तांनी केली आहे.

**<u>ऑलिंपिकक्रिकेट</u>**

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे २०२८मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळानं काल या बाबतची घोषणा केली. ऑलिंपिकमध्ये २०

षटकांचे सामने होणार असून त्यात पुरुष आणि महिला गटांच्या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ प्रत्येकी १५ खेळाडू खेळवू शकेल.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल बेंगलोरमध्ये झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघावर ६ गडी राखून विजय मिळवला. रॉयल चॅलेंजर्सने दिलेलं १६४ धावांचं आव्हान दिल्ली कॅपिटल्सनं १७ षटकं आणि ५ चेंडूत ४ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं.

**<u>पाऊस</u>**

भंडारा जिल्ह्यात काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसानं हवेत गारवा निर्माण झाला असून उकाड्यापासून नागरिकांना सुटका मिळाली आहे.

**<u>हवामान</u>**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, कोकण, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**